# कृषि पणन विषयक बातम्या : सप्टेंबर 2023

Sakal Dt. 30/09/2023

## आणखी दोन लाख टन कांदा खरेदी होणार

मुंबई, ता. २९ : नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी २ हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल दराने 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' या दोन्ही संस्थांमार्फत प्रत्येकी एक-एक लाख टन अतिरिक्त कांदा खरेदी करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

कांदा उत्पादन, खरेदी तसेच विक्री दराविषयी १४० कोटी जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नसल्याचे आश्वासन केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी दिले आहे.

नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांच्या समस्यांवर केंद्र शासनाच्या सहकार्यातून मार्ग काढण्यासाठी, 'कृषीभवन' येथे बैठक झाली. या बैठकीस केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार, 'नाफेड'चे अप्पर व्यवस्थापकीय संचालक एस.के.सिंग, 'एनसीसीएफ'चे व्यवस्थापकीय संचालक ॲनीस जोसेफ चंद्रा आदी होते.


कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे कोणत्याही परिस्थितीत नुकसान होऊ नये यासाठी राज्य शासनामार्फत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. देशांतर्गत कांद्यांचे दर नियंत्रणात राहण्यासाठी केंद्र शासनाने सकारात्मक पावले उचलली आहेत. आता आणखी ४00 कोटी रुपयांचा कांदा खरेदी करण्यात येईल.

**- अब्दुल सत्तार**, पणनमंत्री

Punyanagari Dt. 30/09/2023

# कांदा कोंडीवर तोडगा

## केंद्र सरकार दोन लाख टन कांदा खरेदी करणार



**। नवी दिल्ली :** केंद्र सरकारने दोन लाख टन कांदा खरेदीची परवानगी दिली असून, नाफेड आणि एनसीसीएफ या दोन संस्थांच्या माध्यमातून ही खरेदी केली जाणार आहे, अशी माहिती राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी शुक्रवारी येथे दिली. कांदा निर्यातीवर लावलेल्या ४० टक्के शुल्काच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत सरकार सकारात्मक असल्याची ग्वाही केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनी महाराष्ट्रातील नेत्यांच्या शिष्टमंडळाला दिल्याचेही सत्तार यांनी सांगितले.

नाशिक बाजार समितीमधील व्यापाऱ्यांनी गेल्या अनेक दिवसांपासून कांदा खरेदी बंद केल्यामुळे राज्यात झालेली 'कांदाकोंडी' सोडवण्यासाठी नवी दिल्ली येथे केंद्रीय उद्योग आणि वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांनी राज्यातील मंत्री, शेतकरी आणि व्यापारी यांची बैठक बोलावली होती. या बैठकीस महाराष्ट्राचे पणनमंत्री अब्दुल सत्तार, तसेच केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार उपस्थित होत्या. बैठकीनंतर त्याविषयी माहिती देताना सत्तार यांनी सांगितले की, केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांच्यासोबत झालेल्या चर्चेत महाराष्ट्रातील ▶▶ पान ४ वर...

## पाकचे फावले!

**। नाशिक :** केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेल्या ४० टक्के शुल्कामुळे अघोषित कांदा निर्यातबंदी झाली आहे. त्याचा फायदा आता पाकिस्तान आणि चीनमधील कांदा निर्यातदारांना होतो आहे. परदेशात या दोन्ही देशांतील कांद्याची मागणी वाढली आहे. त्याचा दूरगामी परिणाम भारतीय कांदा उत्पादकांना सोसावा लागणार आहे.

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेल्या ४० टक्के शुल्कामुळे राज्यभरातील बाजार समित्यांमध्ये महिन्यापासून दरात मोठी घसरण झाली आहे. ▶▶ पान ४ वर...

## कांदा कोंडीवर तोडगा

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याबाबत गंभीर चर्चा झाली. केंद्र सरकारने 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' या संस्थांमार्फत शेतकऱ्यांचा कांदा थेट बाजार समिती आवारातून खरेदी करण्याची मागणी करण्यात येत होती. त्याबाबत या दोन संस्थांच्या माध्यमातून दोन लाख टन कांदा खरेदी करण्यात येणार आहे. एवढेच नव्हे, तर कांदा निर्यातीवरील ४० टक्के कराच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची हमीसुद्धा गोयल यांनी यावेळी दिली. केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेल्या ४० टक्के करास व्यापारी वर्गाकडून मोठा विरोध असून, त्यांनी कांद्याची खरेदी थांबवली आहे. यामुळे राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यासमोर संकटे निर्माण झाली आहेत. शेतात कांदा पडून आहे. कांद्याची खरेदी न झाल्यास, तो 'चाळीं'त वा 'बराकीं'तच खराब होण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिल्लीत ही बैठक बोलावण्यात आली होती.

## पाकचे फावले!

क्विंटलमागे २८०० ते ३००० रुपयांवर गेलेले दर गेल्या पंधरवड्यात २००० ते २४०० रुपयांवर आले. त्यातच १० दिवसांपासून नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी असहकार आंदोलन करत कांदा लिलावात सहभागी न होण्याची भूमिका घेतली आहे. त्यामुळे बाजार समित्यांमधील कांदा लिलाव बंद असून, आतापर्यंत २२५ कोटींचे व्यवहार ठप्प झाले आहेत. गेल्या महिन्यात केंद्र सरकारने किरकोळ बाजारात कांदा दरवाढीची चिन्हे दिसताच कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावले. त्यामुळे एका महिन्यात कांदा निर्यातीत ८० टक्क्यांनी घसरण झाली आहे. चेन्नईतील तुतीकोरीन बंदरावरून एका आठवड्यात किमान ११२५ मेट्रिक टन, तर मुंबईच्या जेएनपीटीवरून तीन हजार मेट्रिक टन कांदा रोज निर्यात होतो. मात्र आता ही निर्यात अवघी २० टक्क्यांवर आली आहे. परदेशात पाकिस्तानी कांद्याला मागणी वाढत असून, तेथील भारतीय बाजारपेठेला फटका बसत आहे. नाशिक जिल्ह्यातून रोज २५ ते ३० कंटेनर्समधून कांदा जायचा. मात्र सध्या केवळ चार ते पाच कंटेनर्सद्वारे तो जात आहे. सध्या बेल्लारी परिसरात कांदा काढणी सुरू असून, आठवड्यातून सध्या फक्त १२ ते १५ कंटेनर्स माल निर्यात होत आहे. कांदा निर्यात शुल्कामुळे स्थानिक बाजारात आवक वाढून त्याचे दर क्विंटलला एक हजार रुपयांपर्यंत उतरले होते. मात्र ज्या शेतकऱ्यांनी दरवाढीच्या अपेक्षेने कांदा साठवणूक केली, त्यांना सध्या मातीमोल दरात तो विक्री करावा लागत आहे. दुसरीकडे व्यापाऱ्यांनीही आपल्या मागण्यांसाठी बंद पुकारल्याने शेतकऱ्यांची आणखी कोंडी होत आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेशातून कांदा मोठ्या प्रमाणात दुबई, मलेशिया, व्हिएतनाम, श्रीलंकेत निर्यात होतो. परदेशात सध्या पाकिस्तानी कांदा ३०० डॉलर्स प्रतिटन, तर भारतीय कांदा ५०० डॉलर्स प्रतिटनाने विक्री होत असल्याने परदेशी ग्राहक पाकिस्तानी कांद्याला पसंती देत असल्याचे दिसते.

Indian Express Dt. 30/09/2023

# Vinchur market starts auction, 5,000 quintals of onion sold


PARTHA SARATHI BISWAS
PUNE, SEPTEMBER 29

AFTER EXTENSIVE consultation with traders of the Vinchur sub-market, the Lasalgaon wholesale market managed to start the auction of onions and close to 5,000 quintals were sold.

Balasaheb Kshirsagar, chairman of Lasalgaon's wholesale market in Niphad taluka of Nashik district, said they have started issuing show cause notices to traders who have been boycotting auctions in the markets since the last 10 days.

Onion traders and commission agents of Nashik have boycotted trade to press their demands, which includes an immediate withdrawal of the 40 per cent export duty and stop the sale of onions in the open markets, which traders claim, push their prices down.

Multiple meetings with Deputy Chief Ministers Ajit Pawar and Devendra Fadnavis as well as Union minister Piyush Goyal have failed to reach a solution. Kshirsagar, while speaking to The Indian Express, said 40 traders participated in the auction of onion in the Vinchur market. The average price of onions at the market was Rs 2,100/quintal. This was the price the kitchen staple fetched before traders of the 15 markets in Nashik district went on a strike.



As many as 40 traders participated in the auction of onions in Vinchur market. *Express file*

Many traders alleged their contemporaries in Vinchur were pressurised to start auctions. Meanwhile, Kshirsagar said they have started the process of taking action against traders and commission agents who are boycotting the auction. "The legal process is on," he said.

Most traders have decided to turn in their licence to escape action. Traders said their meetings with Piyush Goyal also failed as the Union Minister did not accept their demand of the central agencies offloading the procured onion at separate markets. The traders have asked for recession of the market cess they are charged these days.

On Friday, Maharashtra's minister of marketing Abdul Sattar met with the central government agencies to find a way out of the present situation. NCP MP Supriya Sule took to X (formerly known as Twitter) to criticise the move saying that not a single onion grower or other senior ministers of the state government had attended the meeting. "This shows both the central and state government are not serious about the issue raised by onion growers and traders."

Agrowon Dt. 28/09/2023

# केंद्राच्या हस्तक्षेपामुळे कांदा निर्यातीत ८० टक्क्यांवर घट

मुकुंद पिंगळे : ॲग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : केंद्र सरकारने ग्राहकहित जोपासण्यासाठी कांदादरात सुधारणा होताच हस्तक्षेप करत निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावण्याचा निर्णय घेतला. आवक कमी होऊन मागणी वाढून पुरवठा घटल्याने कांदादरात सुधारणा होताना दिसताच सरकारने ही आडकाठी आणली. परिणामी, २० ऑगस्टपासून निर्यात कामकाज विस्कळीत झाले. व्यापारी असोसिएशन २० सप्टेंबरपासून लिलावात सहभागी नाही. प्राप्त माहितीनुसार केंद्र सरकारच्या या अन्यायकारक निर्णयामुळे कांदा निर्यात ८० टक्क्यांवर घटली आहे.

ऑगस्टच्या दुसऱ्या सप्ताहात कांदादरात सुधारणा दिसताच दरवाढीचा बाऊ करत केंद्र सरकारने कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क लागू केले. परिणामी, भारतीय कांद्याला मागणी असूनही निर्यातीला ब्रेक लागला. लिलावातील दरापेक्षा निर्यात शुल्क अधिक असल्याची स्थिती आहे. आयातदार देशांमध्ये नाशिक येथून निर्यात मुंबई बंदरामार्गे होत असते; मात्र या निर्णयामुळे सध्या अत्यल्प प्रमाणात कामकाज सुरू आहे. तर सध्या चेन्नई बंदरातून कर्नाटकातील नवीन खरीप कांद्याची निर्यात सुरू आहे. मात्र हे कामकाज तुलनेत कमी आहे.

## तुर्कीच्या कांद्याला दुबईत वाढली मागणी

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू पाहणारे केंद्र सरकार आता उत्पन्नवाढीत आडवे येत असल्याची स्थिती आहे. भारतीय उन्हाळ कांद्याची निर्यात रोडवल्याने दुबई बाजारात तुर्कीमधील कांदा येत आहे. तुलनेत हा कांदा भारतीय कांद्याच्या स्पर्धेत उतरणारा नाही; मात्र सध्या हा कांदा भाव खात असून त्यास चांगले दर मिळत असल्याचे एका निर्यातदाराने सांगितले.

### देशातील कांदा निर्यात स्थिती

| पुरवठा केंद्र | १८ ऑगस्टपर्यंत निर्यात शुल्क नसताना | १९ ऑगस्टनंतर शुल्क लागू केल्यानंतर |
|---|---|---|
| तुतीकोरीन बंदर | २५ ते ३० कंटेनर(आठवडा) | ० |
| मुंबई बंदर | १०० ते १२० (दैनंदिन) | १५ ते १८ |
| नाशिक | २५ ते ३० (दैनंदिन) | ३ ते ४ |
| चेन्नई | ४५ ते ५० (दैनंदिन) | १२ ते १ |

### गेल्या तीन वर्षांतील निर्यात स्थिती

| वर्ष | निर्यात(टन) | मिळालेली रक्कम (लाख) |
|---|---|---|
| २०२०-२१ | १५,७८,०१६ | २,८२,६५३.४६ |
| २०२१-२२ | १५,३७,४९६.८९ | ३,४३,२१६.३२ |
| २०२२-२३ | २५२५२५८.३८ | ४,५२,२७९.१५ |

**निर्यात शुल्क लावण्याच्या निर्णयाने मोठी कोंडी झाली. सातत्याने निर्यात बंद होत असल्याने बेभरवशाचा कांदा पुरवठादार देश म्हणून आपली ओळख तयार होत आहे. शेतकरी, व्यापारी, निर्यातदार, बाजार समित्या, राज्य व केंद्र शासनाच्या प्रतिनिधींनी समिती स्थापून अभ्यास करणे गरजेचे आहे,**

**– मनोज जैन**, कांदा निर्यातदार व व्यापारी, लासलगाव, जि. नाशिक

# कांदा प्रश्न पुन्हा दिल्लीदरबारी ; उद्या बैठक

ॲग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : कांदा व्यापाऱ्यांनी केलेल्या मागण्यासमोर राज्य आणि केंद्र सरकारने न झुकता २९ सप्टेंबर रोजी बैठक बोलविण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (ता. २६) रात्री बोलविण्यात आलेली बैठक कुठल्याही निर्णयाविना झाली. दिल्लीत होणाऱ्या बैठकीत योग्य तोडगा काढू, पण संप मागे घ्या, असे आवाहन गोयल यांनी केले.

दरम्यान, कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ'ने थेट शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करावी, अशी लोकप्रतिनिधींनी मागणी केली. दिल्ली येथील बैठकीस राज्य मंत्रिमंडळ सदस्यांचे शिष्टमंडळ उपस्थित राहील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर सह्याद्री शासकीय अतिथिगृह येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीला केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री भारती पवार, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री धनंजय मुंडे, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे, पणनमंत्री अब्दुल सत्तार आमदार आणि अधिकारी उपस्थित होते.

'नाफेड' आणि 'एनसीसीएफ'मार्फत खरेदी केलेला कांदा इतर राज्यातील खासगी व्यापाऱ्यांना कमी दरात मिळत असल्याने, यामुळे महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांचे नुकसान होऊ लागल्याने त्यांनी कांद्याचे लिलाव बंद केले होते. त्याचा फटका शेतकऱ्यांना बसत होता.

Agrowon Dt. 28/09/2023

Sakal Dt. 27/09/2023



# कांदाप्रश्नी शुक्रवारी दिल्लीत बैठक

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. २६ : ''कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती आवारात नाफेड आणि 'एनसीसीएफ' यांनी थेट शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करावी, अशी लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी दिल्ली येथे शुक्रवारी (ता. २९) बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात येईल,'' अशी माहिती केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी दिली. दिल्ली येथील बैठकीस राज्य मंत्रिमंडळ सदस्यांचे शिष्टमंडळ उपस्थित राहील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

पान ८ वर

# कांदाप्रश्नी शुक्रवारी दिल्लीत बैठक

पान १ वरून


''कांदा उत्पादक शेतकरी, व्यापाऱ्यांसह ग्राहकवर्गाच्याही हिताचे रक्षण करण्याचा राज्य शासनाचा सर्वतोपरी प्रयत्न आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी आणि ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी नाशिक जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी लिलाव बंदीचा निर्णय मागे घेऊन तातडीने कांदा खरेदी सुरू करावी,'' असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी केले. नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री पीयूष गोयल व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज सायंकाळी मुंबईतील सह्याद्री शासकीय अतिथिगृह येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. देशांतर्गत कांद्याचे दर नियंत्रणात राहण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून दोन हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल दराने नाफेड आणि एनसीसीएफ मार्फत दोन लाख टन कांदा खरेदीचा निर्णयही केंद्र शासनाने घेतला होता. दोन्ही यंत्रणांमार्फत अत्यंत कमी प्रमाणात खरेदी करण्यात आली असून खरेदीची मुदत दहा सप्टेंबरला संपली आहे.

Loksatta Dt. 27/09/2023

# सरकार कांदा उत्पादकांच्या पाठीशी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही; लिलाव सुरू करण्याचे आवाहन

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** कांदा उत्पादक शेतकरी, कांदा खरेदी व्यापारी आणि ग्राहक या सर्वांच्या हिताचाच शासन विचार करणार असून शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिली. कांदा व्यापाऱ्यांच्या प्रश्नांवर तोडगा काढण्याची विनंती पवार यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल यांना केली.

कांद्याचे दर पडत असल्याने शेतकरी व व्यापारी चिंतेत असून कांदा लिलाव बंद आहेत. त्यामुळे या प्रश्नी तोडगा काढण्यासाठी बाजार समित्यांचे पदाधिकारी, व्यापारी आणि अन्य संबंधितांची बैठक पवार यांच्याकडे आयोजित करण्यात आली होती.

व्यापाऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समित्यांध्ये बंद ठेवलेली कांदा खरेदी तात्काळ सुरू करावी, असे आवाहन करून पवार म्हणाले, कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे देशांतर्गत कांद्याचे दर नियंत्रणात राहण्यासाठी निर्यातीवर ४० टक्के शुल्क आकारणीचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये, म्हणून केंद्र शासनाने २ हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल दराने नाफेड आणि एनसीसीएफ मार्फत २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचा निर्णय घेतला होता. मात्र, दोन्ही यंत्रणांमार्फत अत्यंत कमी प्रमाणात खरेदी करण्यात आली असून खरेदीची मुदतही १० सप्टेंबरला संपली आहे. त्यातच नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी बंद पुकारल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. देशातील इतर राज्यांच्या बाजारांमध्ये नाफेडमार्फत कमी दरात कांदा विक्री होत असल्यामुळे राज्यातील कांदा व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे, असे व्यापाऱ्यांनी बैठकीत म्हणणे मांडले. हा विषय केंद्राच्या अखत्यारीत येत असल्याने याबाबत केंद्रीय मंत्री गोयल यांच्याबरोबर चर्चा करून तोडगा काढण्याचा निर्णय पवार यांच्याकडे झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

### निर्यात शुल्काची गरज काय? : शरद पवार

कांदा व्यापाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचीही मंगळवारी दुपारी भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना पवार म्हणाले, कांद्यावर आकारण्यात आलेले ४० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्यात यावे, अशी आमची मागणी आहे. निर्यात शुल्क आकारण्याची गरजच नाही.

# केंद्राशी बोलून नक्की मार्ग काढू, पण, तात्काळ कांदा खरेदी सुरू करावी

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे व्यापाऱ्यांना आवाहन

**मुंबई, (प्रतिनिधी) :** नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांच्या समस्यांवर केंद्र सरकारच्या सहकार्यातून मार्ग काढला जाईल, अशी ग्वाही देताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कांदाप्रश्नी मंत्रालयात आयोजित बैठकीतूनच केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांना दूरध्वनी केला. गोयल यांनीही उपमुख्यमंत्र्यांच्या दूरध्वनीला प्रतिसाद देत कांदा व्यापाऱ्यांच्या प्रश्नी लागलीच बैठक घेऊन तोडगा काढण्याचे, प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. प्रश्न सोडवू, पण व्यापाऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये बंद ठेवलेली कांदा खरेदी तात्काळ सुरू करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रालयात कांद्याचा वांदा सोडवण्यासाठी बैठक झाली. या बैठकीला विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादाजी भुसे, पणनमंत्री अब्दुल सत्तार, कांदा उत्पादक भागातील आमदार व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नाफेडचे अधिकारी, तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, कडासी, नांदगाव, उमराणा, येवला, देवळा, लासलगाव, पिंपळगाव या कृषी उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी आणि व्यापारी उपस्थित होते. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे कोणत्याही परिस्थितीत नुकसान होऊ नये, यासाठी राज्य सरकारमार्फत प्रयत्न करणार असल्याचे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले. देशांतर्गत कांद्याचे दर नियंत्रणात राहण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर ४० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. या निर्णयामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून केंद्र शासनाने २ हजार ४१० रुपये प्रतिक्विंटल दराने नाफेड आणि एनसीसीएफमार्फत २ लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचा निर्णय घेतला होता. मात्र, दोन्ही यंत्रणांमार्फत अत्यंत कमी प्रमाणात खरेदी करण्यात आली असून, खरेदीची मुदतही १० सप्टेंबरला संपली आहे. त्यातच नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी बंद पुकारल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे.

Kesari Dt. 27/09/2023

Agrowon Dt. 27/09/2023

# ..तर पणन महासंघामार्फत कांदा खरेदी करणार

## पणनमंत्री सत्तारांचा इशारा; केंद्रीय मंत्री गोयल यांच्याशी चर्चा

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

मुंबई : नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी पुकारलेल्या बंदच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या दालनात मंगळवारी (ता. २६) दोन स्वतंत्र बैठका झाल्या. मात्र या बैठकांमध्ये तोडगा निघाला नाही. त्यामुळे पणनमंत्री सत्तार यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघामार्फत कांदा खरेदी करू, असा इशारा दिला.

दरम्यान रात्री उशिरा सह्याद्री अतिथिगृहात केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी बैठक बोलविली असल्याने याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मंत्रालयातील बैठकीत कांदा व्यापाऱ्यांनी बंद मागे घेतला नाही, तर राज्याची यंत्रणा म्हणून



'नाफेड', 'एनसीसीएफ'मार्फत कांदा खरेदी केला जाईल, असा इशारा सत्तार यांनी दिला. तसेच कांदा खरेदी बंद केल्याने झालेल्या नुकसानीबाबत अनुदान देण्यात येईल का याचाही विचार करत आहोत, असेही त्यांनी बाजार समितीच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दालनातल्या बैठकीत कांदा व्यापाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे केंद्र सरकारशी संबंधित असल्याने पवार यांनी बैठकीतूनच केंद्रीय वाणिज्यमंत्री गोयल यांच्याशी चर्चा केली. या वेळी गोयल हे मुंबईतच असल्याने त्यांनी सायंकाळी या बाबत बैठक घेऊ, असे सांगितल्याने पवार यांच्या दालनातील बैठक आटोपती घेतली. पान ४ वर »

### निर्यात शुल्क रद्द झाले पाहिजे : शरद पवार

कांद्याचे दर भविष्यकाळात वाढतील ही सरकारची भीती खरी नाही, त्यामुळे कांद्यावरील ४० टक्के निर्यात शुल्क रद्द करावे, अशी मागणी शरद पवार यांनी केली. वाणिज्यमंत्री पीयूष गोयल हे त्याबाबत सकारात्मक निर्णय घेतील असेही ते म्हणाले. श्री. पवार म्हणाले, की मला कांदा व्यावसायिकांचे शिष्टमंडळ येऊन भेटून गेले. त्यांनी त्यांच्या मागण्या मांडल्या. तेव्हा सरकारने कांद्यावर लादलेला ४० टक्के निर्यात कर कमी करावा. चाळीस टक्के निर्यात शुल्क लावल्यामुळे कांदा व्यापाऱ्यांसह शेतकऱ्यांवर परिणाम झाला आहे. हे शुल्क रद्द झालेच पाहिजे.

# ..तर पणन महासंघामार्फत कांदा खरेदी करणार

पान १ वरून

त्यानंतर लगेचच पणनमंत्री सत्तार यांनी त्यांच्या दालनात स्वतंत्र बैठक घेतली. या वेळी व्यापाऱ्यांनी बाजार समितीकडे जमा केलेले परवाने कुठल्याही परिस्थितीत देऊ नका, असे निर्देश बाजार समित्यांना दिले. तसेच बाजार बंद ठेवून लासलगाव, कळवण, निफाड, उमराणे, पिंपळगाव (बसवंत), नामपूर येथील व्यापाऱ्यांनी कमी दरात खरेदी केलेला कांदा विक्री केला आहे, अशा तक्रारीही आपल्याकडे आल्याचे सत्तार यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या दालनात झालेल्या बैठकीत व्यापारी प्रतिनिधींनी 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' बाजार समितीबाहेर कांदा खरेदी करत आहे. शिवाय खरेदी केलेला कांदा परराज्यांतील व्यापाऱ्यांना कमी दराने विकला जात आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी जास्त दराने कांदा खरेदी केला तरी 'नाफेड' व 'एनसीसीएफ'च्या दराशी तुलना करताना तो कमी दराने विकावा लागत आहे. त्यामुळे नुकसान होते. केंद्र सरकारने ४० टक्के निर्यात शुल्क लावले असल्याने मोठा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे तातडीने ही बंदी उठवावी. तसेच बाजार समित्या आकारत असलेला एक रुपयांचा सेस ५० पैसे करावा, अशी मागणीही केली. यावर पवार यांनी राज्य सरकारच्या अखत्यारितील मुद्द्यांवर आपण मार्ग काढू. मात्र केंद्र सरकारशी संबंधित मुद्द्यांबाबत गोयल यांच्याशी चर्चा काढून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू, असे सांगितले.

बैठकीला विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, सार्वजनिक बांधकाममंत्री दादा भुसे, पणनमंत्री अब्दुल सत्तार, आमदार हिरामण खोसकर, राहुल अहिर, नितीन पवार, दिलीप बनकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशिष शर्मा, दूरदृश्य प्रणालीद्वारे कृषी आयुक्त सुनील चव्हाण, नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा पणन महामंडळाचे संचालक केदारी जाधव, उपसंचालक अविनाश देशमुख, 'नाफेड'चे अधिकारी निखिल पाडदे, 'नाफेड' मुंबईचे अधिकारी पुनीत सिंह, लासलगाव बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे, सहसचिव प्रकाश डमावत, सभापती प्रशांत देवरे, देवळा बाजार समितीचे सभापती बापू देवरे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष खंडू देवरे, यज्ञेश कडासी, नांदगाव, उमराणा, येवला, देवळा, लासलगाव, पिंपळगाव या बाजार समित्यांचे पदाधिकारी, व्यापारी उपस्थित होते.

### चाळीवर जाऊन कांदा खरेदी करू : सत्तार

कांदा व्यापारी अचानक संप करून शेतकऱ्यांना वेटीस धरत आहेत. त्यांच्यामुळे शेतकऱ्यांचा कांदा सडायला लागला आहे. त्यामुळे आम्ही लवकरच या व्यापाऱ्यांवर निर्बंधासाठी नियमावली करत करू. मनात आला की संप करायचा हे चालणार नाही, असे पणनमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले. "आम्ही मार्केटिंग फेडरेशनला उतरवून कांदा खरेदी करू, त्यामुळे व्यापाऱ्यांनी संप केला तरी शेतकऱ्यांना अडचण येणार नाही. केंद्राला कधी कोणता कांदा मार्केटमध्ये उतरवायचा हा त्यांचा निर्णय आहे. त्यामुळे 'नाफेड' आणि 'एनसीसीएफ' कांदा मार्केटमध्ये उतरवणे बंद करा ही मागणी मान्य होणारी नाही, असेही सत्तार म्हणाले. पीयूष गोयल हे मुंबईत आहेत. त्यांना भेटून ४० टक्के निर्यात शुल्क रद्द करावी, अशी मागणी करणार आहे. सेसपोटी ५० पैसे घ्यावेत अशीही व्यापाऱ्यांची मागणी आहे. त्यावरीही मंगळवारी सायंकाळी चर्चा करणार आहोत. व्यापारी हटले नाहीत तर आम्ही मार्केटिंग फेडरेशनमार्फत चाळींवर जाऊन कांदा खरेदी करू, असेही ते म्हणाले.

Pudhari Dt. 26/09/2023

# कांदा उत्पादकांना मिळणार ८१८ कोटींचे अनुदान

## चोवीस जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मिळणार लाभ

**नगर : पुढारी वृत्तसेवा**

बाजार समितीमध्ये विक्री केलेल्या राज्यातील ३ लाख ४४ हजार कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ८१८ कोटी ७२ लाख रुपये देण्यासंदर्भात कार्यवाही सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातवरण आहे.



२०२३ च्या खरीप व रब्बी हंगामातील कांद्याला प्रति क्विंटल ३.५० पैसे अनुदान राज्य शासनाने जाहीर केले होते. अनेक दिवसांनंतरही अनुदान न मिळाल्याने नगर जिल्ह्यातील शेतकरी शिष्टमंडळाने पणन संचालकांची पुणे येथे भेट घेतली. १ फेब्रुवारी २०२३ ते ३० मार्च २०२३ या दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये बाजार समित्यांमध्ये विक्री झालेल्या कांद्याला प्रतिक्विंटल ३.५० पैसे अनुदान दिले जात आहे. त्याची कार्यवाही सुरू आहे. शासनाने शेतकऱ्यांचे बँक डिटेल्स मागविलेले होते. राज्यात एकूण ३ लक्ष ४४ हजार ६५३ शेतकरी अनुदानास पात्र ठरले असून, प्रती लाभार्थी २०० क्विंटलची मर्यादेत अनुदान दिले जाणार आहे. ७० हजार रुपये पर्यंत अनुदान देण्याची मर्यादा ठरविण्यात आलेली आहे. १२ हजार ५० शेतकरी कुटुंबातील दोन व्यक्तीच्या नावे कांदा विक्री झाली असून, खातेनंबर एकच असल्याने व इतर काही कारणास्तव पात्र, अपात्रतेच्या रक्कम निश्चित करणे बाकी आहे.

### दहा जिल्ह्यांना तीन हप्त्यांत रक्कम देणार

राज्यातील २४ जिल्ह्यांना अनुदान दिले जाणार असून, त्यातील १४ जिल्ह्यात संपूर्ण २२ कोटी एक रकमी अदा करण्याचे कार्यवाही सुरू आहे. उर्वरित १० जिल्ह्यांना अनुदानाची रक्कम जास्त असल्याने १० हजार रुपयांपर्यंत पहिला हप्ता दिला जाणार आहे. त्या अनुषंगाने राज्यात ४६५ कोटी रुपयाचा पहिला हप्ता देण्याची कार्यवाही सुरू केली आहे. उर्वरित १० जिल्ह्यांसाठी रक्कम जास्त असल्याने तीन हप्त्यांत रक्कम अदा करणार असल्याचे माहिती पणन संचालक कार्यालयाकडून देण्यात आली.

# कांदा लिलावासंदर्भात आज पणन मंत्र्यांनी बोलविली बैठक

**ॲग्रोवन वृत्तसेवा** Agrowon Dt. 26/09/2023

**मुंबई :** नाशिक जिल्हा व्यापारी असोसिएशनने केंद्र आणि राज्य सरकारकडे केलेल्या मागण्या जोपर्यंत पूर्ण होत नाहीत तोपर्यंत कांदा खरेदी न करण्याचा निर्णय घेतल्याने ठप्प असलेली कांदा खरेदीची कोंडी अद्याप सुटलेली नाही. यावर मार्ग काढण्यासाठी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी मंगळवारी (ता. २६) मंत्रालयात बैठक बोलाविली आहे. या बैठकीला असोसिएशनचे पदाधिकारी, बाजार समितीचे पदाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

व्यापारी असोसिएशनने कांदा लिलाव बंद केल्याने बाजार समितीतील उलाढाल ठप्प झाली आहे. परिणामी शेतकऱ्यांचे नुकसान होत असून ही कोंडी फोडण्यासाठी सरकारी पातळीवरती विशेष प्रयत्नांना यश आले नाही. त्यामुळे नाराजी व्यक्त करण्यात येत होती. २० सप्टेंबरपासून लिलाव बंद करण्याचा इशारा देऊनही सरकारने या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले. तसेच व्यापाऱ्यांनी लिलाव बंद केल्याने जिल्हा उपनिबंधक आणि संबंधित व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करून त्यांचे भूखंड जमा करण्याबाबत कळविले होते, तत्पूर्वीच व्यापाऱ्यांनी आपले परवाने जमा केल्याने पेच निर्माण झाला होता. दरम्यान येवला येथे दौऱ्यावर असताना व्यापाऱ्यांवर कारवाईचे संकेत पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले होते, त्यामुळे नाराजीही व्यक्त केली होती.

Pudhari Dt. 25/09/2023

# पणनमंत्र्यांकडे उद्या कांदाप्रश्नी बैठक

**अवघ्या नाशिक जिल्ह्याचे लागले लक्ष; बाजार समित्यांमध्ये व्यवहार ठप्पच**

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

कांद्यावरील ४० टक्के निर्यातमूल्य रद्द करावे, बाजार समित्यांमधील कर कमी करावे, यासह विविध मागण्यांसाठी जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी बंद पुकारला आहे. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी मंगळवारी (दि. २६) मुंबईत बैठक बोलविली आहे. या बैठकीकडे अवघ्या जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. व्यापाऱ्यांनी लिलावात सहभागी न होण्यांच्या भूमिकेवर ठाम असल्याने बाजार समित्यांमध्ये व्यवहार अद्यापही ठप्पच आहेत.



केंद्र सरकारने नाफेड व एनसीसीएफद्वारे खरेदी केलेला कांदा देशांतर्गत घाऊक बाजारात न आणता तो थेट रेशनवर उपलब्ध करून द्यावा, देशाअंतर्गत कांदा वाहतुकीत ५० टक्के सबसिडी तर निर्यातीमध्येही ५ टक्के सवलत देण्यात यावी, अन्य राज्यांप्रमाणे बाजार समित्यांमध्ये आडत लागू करावी यासह विविध मागण्यांसाठी जिल्ह्यातील एक हजारांहून अधिक कांदा व्यापाऱ्यांनी बंद पुकारला आहे. मंगळवारपासून (दि. १९) कांदा व्यापारी बाजार समित्यांमधील लिलावात सहभागी होत नसल्याने कांदा व्यवहार ठप्प पडले आहेत. व्यापाऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी पालकमंत्री दादा भुसे यांनी २१ तारखेला बैठक घेतली. मात्र, व्यापाऱ्यांच्या बहुतांक्ष मागण्या या केंद्र व राज्यस्तरावरील धोरणात्मक बाब असल्याने सदर बैठक निष्फळ ठरली. त्यामुळे व्यापाऱ्यांनी संपाचा पवित्रा कायम ठेवला आहे.

व्यापाऱ्यांच्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी राज्याचे पणनमंत्री अब्दुल सत्तार यांनी मंगळवारी (दि. २६) बैठक बोलविली आहे. बैठकीत व्यापारी व शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. त्या बैठकीत मागण्यांबाबत काय तोडगा निघतो यावर बंदचे भवितव्य ठरणार आहे. या प्रश्नी सकारात्मक निर्णय होऊन कांदा व्यवहार पूर्ववत होवो, अशीच अपेक्षा सर्वच स्तरातून व्यक्त केली जात आहे.

## ...तर बेमुदत बंद

येवल्यात दोन दिवसांपूर्वी कांदा व्यापारी संघटनेचे पदाधिकारी व सभासदांची बैठक झाली. या बैठकीत मंगळवारी (दि. २६) होणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीत मागण्यांवर योग्य निर्णय न झाल्यास बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसे झाल्यास जिल्ह्यासह राज्य व देशपातळीवर कांद्याची कोंडी निर्माण होईल.

Agrowon Dt. 18/09/2023

# खासगी बाजार समित्यांच्या मूल्यमापन समितीची बुधवारी बैठक

## गटाचे अध्यक्ष उमाकांत दांगट यांची माहिती

ॲग्रोवन वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील खासगी बाजार समित्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यासाठी शासनाने अभ्यास गटाची स्थापना केली आहे. या अभ्यास गटाची पहिली बैठक पुणे येथील पणन मंडळाच्या कार्यालयात बुधवारी (ता. २०) होणार असल्याची माहिती अभ्यास गटाचे अध्यक्ष व माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांनी दिली.

या अभ्यास गटामध्ये दहा सदस्यांचा समावेश आहे. समितीचे अध्यक्ष माजी कृषी आयुक्त दांगट यांच्या अध्यक्षतेखाली समितीमध्ये पणन संचालक, पणन सहसचिव सुग्रीव धपाटे, माजी पणन संचालक सुनील पवार, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, बाजार समिती संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पणन सहसंचालक, माजी कृषी संचालक जयवंत महल्ले, शेतकरी सदस्य उदय देवळाणकर (छत्रपती संभाजीनगर), रमेश शिंदे (नाशिक) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

दांगट म्हणाले, ''शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी कृषी बाजार व्यवस्था बळकट करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी सध्याची पर्यायी व्यवस्था अधिक स्पर्धात्मक, कार्यक्षम व शेतकरी केंद्रित करणे आवश्यक आहे. शासनाने गठित केलेला हा अभ्यास गट त्या अनुषंगाने विविध पैलुंचा अभ्यास करून शासनास अहवाल सादर करील. ४५ दिवसांमध्ये अहवाल शासनास सादर करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

Agrowon Dt. 15/09/2023

# राज्यातील खासगी बाजार समित्यांचे होणार मूल्यमापन

## माजी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : शेतीमालाच्या खरेदी-विक्रीच्या पारंपरिक बाजार समितीच्या व्यवस्थेत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या फसवणुकीला पायबंद घालण्यासाठी शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या खासगी बाजार समित्यांमध्येही शेतीमालाला अधिकचा दर मिळत नसल्याचे समोर आले आहे. यामुळे राज्यातील खासगी बाजार समित्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्यासाठी पणन विभागाने माजी कृषी आयुक्त उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली १० सदस्यीय समितीची स्थापना केली आहे.

पान ४ वर »

## राज्यातील खासगी बाजार समित्यांचे होणार मूल्यमापन

» पान १ वरून

या समितीने राज्यातील खासगी बाजार समित्यांचा अभ्यास करून अहवाल सादर करण्याच्या सूचना शासनाने केल्या आहेत.

फळे भाजीपाला नियमनमुक्तीसह, थेट पणनसह खासगी बाजार समित्यांच्या उभारणीला कायद्यान्वये मान्यता देण्यात आली. त्यामुळे राज्यात सुमारे ८० खासगी बाजार समित्या उभारण्यात आल्या. मात्र या बाजार समित्यांचा शेतीमालास अधिकचा बाजारभाव मिळण्यासाठी फारसा उपयोग झाला नसल्याचे शासनाचे मत झाले आहे. यामुळे खासगी बाजार समित्यांचे कामकाज कसे चालते, शेतमालाची खरेदी-विक्री पारदर्शी पद्धतीने होती का? खुल्या लिलावाद्वारे स्पर्धात्मक दर मिळतो का? आदी सर्व कामकाजाची पाहणी समितीने करण्याच्या सूचना शासनाने दिल्या आहेत. समितीमध्ये पणन संचालक, पणन सहसचिव सुग्रीव धपाटे, माजी पणन संचालक सुनील पवार, पणन मंडळाचे कार्यकारी संचालक, बाजार समिती संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पणन सहसंचालक, माजी कृषी संचालक जयवंत महल्ले, शेतकरी सदस्य उदय देवळाणकर (छत्रपती संभाजीनगर), रमेश शिंदे (नाशिक) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

> **“ २००५ नंतर पारंपरिक बाजार व्यवस्थेला पर्याय म्हणून केंद्र सरकारने मॉडेल ॲक्ट आणला. या माध्यमातून खासगी बाजार, थेट पणन परवाना, भाजीपाला नियमनमुक्ती आदी पर्यायांचा अवलंब करण्यात आला. मॉडेल ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्रात झाली. आता १८ वर्षांनंतर पर्यायी व्यवस्थांचा कितपत फायदा शेतकऱ्यांना झाला हे पडताळून पाहण्याची वेळ आली आहे. त्यानुसार शासनाने समिती स्थापन केली आहे.**
>
> **– सुनील पवार,** माजी पणन संचालक आणि समिती सदस्य

Agrowon Dt. 07/09/2023

# कांदा अनुदानापोटी ३०० कोटी वितरित

## उर्वरित १६५.९९ कोटी रुपये देणार दुसऱ्या टप्प्यात

अॅग्रोवन वृत्तसेवा



मुंबई : राज्यातील कांदा उत्पादकांना दिलासा देण्यासाठी जाहीर केलेल्या कांदा अनुदान योजनेतील रक्कम मंगळवारी (ता. ५) कांदा उत्पादकांच्या खात्यावर जमा करण्यात आली. वित्त विभागाने मंजूर केलेल्या ४६५ कोटी ९९ लाख रुपयांपैकी ३०० कोटी रुपये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पणनमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.

राज्य शासनाने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी १ फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधीत विक्री केलेल्या कांद्यासाठी ३५० रुपये प्रतिक्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रतिशेतकरी याप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. यामध्ये राजकीय हस्तक्षेपामुळे अपेक्षेपेक्षा जास्त अर्ज आले. तसेच त्यासाठीच्या रकमेतही वाढ झाली. ४०० कोटी अपेक्षित असताना त्यात वाढ होऊन ८५७ कोटी, ६७ लाख, ५८ हजार रुपयांची रक्कम निश्चित झाली आहे.

त्यापैकी ५३ टक्के रकमेस वित्त विभागाने मंजुरी दिली आहे. मागील आठवड्यात ३ लाख ४४ हजार ६५३ लाभार्थ्यांना ४६५ कोटी ९९ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली होती. मंगळवारी पहिल्या टप्प्यात तीन लाख कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३०० कोटी अनुदान ऑनलाइन वितरित करण्यात आले. उर्वरित अनुदान वितरणासाठी दुसरा टप्पा लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

कांदा अनुदानासाठी १० कोटींपेक्षा कमी अनुदानाची मागणी असलेल्या नागपूर, रायगड, सांगली, सातारा, ठाणे, अमरावती, बुलडाणा, चंद्रपूर, वर्धा, लातूर, यवतमाळ, अकोला, जालना, वाशीम या जिल्ह्यांतील पात्र लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात अनुदान जमा होणार आहे.

### ...असे होणार अनुदान जमा

कांदा अनुदानासाठी १० कोटींपेक्षा जास्त मागणी असलेले नाशिक, उस्मानाबाद, पुणे, सोलापूर, नगर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, जळगाव, कोल्हापूर, बीड या जिल्ह्यांतील पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पहिल्या टप्प्यात प्रत्येकी १० हजारांपर्यंत अनुदान जमा होईल. ज्या शेतकऱ्यांची १० हजार पर्यंतची देयके आहेत त्यांचे पूर्ण अनुदान जमा होईल. तर ज्या लाभार्थ्यांचे देयक १० हजार रुपये पेक्षा जास्त असेल, तर त्या लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पहिल्या टप्प्यात प्रत्येकी १० हजार रुपये अनुदान जमा होणार आहे.